# <u>दोषारोप</u>

मी, एस. एस. पाटील, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, महाड

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नाव | – | नितीन भार्गव सावंत |
| वय | – | ४१ वर्षे |
| व्यवसाय | – | चालक |
| राहणार | – | रिध्दी सिध्दी रेसिडेन्सी सोसायटी, प्लॉट क्र.२७, सेक्टर क्र.९, उलवे, नवी मुंबई. |

तुमच्यावर दोषारोप ठेवला आहे तो खालीलप्रमाणे आहे

तुम्ही आरोपी यांनी दिनांक २६/०३/२०२२ रोजी १६.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे वहूर गावच्या हद्दीत मुंबई गोवा महामार्गावर हॉटेल राजकमल समोर तुमच्या ताब्यातील व्हॅगनार कार वाहन नोंदणी क्र.एम.एच.४३/बी.एन./७६२९ हे महाड बाजुकडून माणगाव बाजुकडे अविचाराने, हयगयीने, बेदरकारपणे व अतिवेगाने स्वतः चालवित घेऊन जात असताना पादचारी इसम राजेंद्र कमलाकर हजारे, वय वर्षे ६०, राहणार – मांजीवली, पो. ता. बदलापुर, जि. ठाणे हा रस्ता ओलांडत आहे या रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन त्यांना ठोकर मारुन अपघात केलात व सदर अपघातात राजेंद्र कमलाकर हजारे यांच्या मृत्यूस (सदोष मनुष्यवध या सदरात न मोडणाऱ्या) कारणीभुत झालात. अशाप्रकारे भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४–अ प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

तुम्ही आरोपी यांनी वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन महाड बाजुकडून माणगाव बाजुकडे मानवी जीवन

धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अथवा क्षती पोहोचण्याचा संभव असुन देखील बेदरकारपणे व हयगयीने चालविले. अशाप्रकारे भारतीय दंड विधान संहिता कलम २७९ प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

तुम्ही आरोपी यांनी वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अविचाराने, बेदरकारपणे व हयगयीने चालवुन पादचारी इसम राजेंद्र हजारे याच्या साध्या किरकोळ स्वरुपाच्या दुखापतीस कारणीभुत झालात. अशाप्रकारे भारतीय दंड विधान संहिता कलम ३३७ प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

तुम्ही आरोपी यांनी वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अविचाराने, बेदरकारपणे व हयगयीने चालवुन पादचारी इसम राजेंद्र हजारे याच्या गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस कारणीभुत झालात. अशाप्रकारे भारतीय दंड विधान संहिता कलम ३३८ प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

तुम्ही आरोपी यांनी वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन निष्काळजीपणे, बेदरकारपणे मानवी जीवास धोका होईल इतक्या हयगयीने चालविले. अशाप्रकारे मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

सही/–
(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०८/१२/२०२२

दोषारोपातील सर्व मजकूर आरोपीला त्याच्या भाषेमध्ये वाचुन व समजावुन सांगितला. सदरचा मजकूर समजल्यानंतर आरोपीची संपरीक्षा नोंदविण्यात आली आहे.

सही/-

महाड (**एस. एस. पाटील**)
दिनांक – ०८/१२/२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड